**कि. फौज. अर्ज क्र.४७/२०२० मध्ये सुपूर्तनामा अर्ज निशाणी ०१ वर आदेश**

०१. सदरचा अर्ज अर्जदार सचिन दासा मायंदळे, रा. राज्य राखीव पोलिस बल वसाहत, हिंगोली यांनी त्यांच्या मालकीचा जप्त असलेला व्हिओ कंपनीचा एस–१ मोबाईल त्यांना सुपूर्तनाम्यावर परत मिळविण्या करीता फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४५७ अन्वये दाखल केलेला आहे.

०२. अर्जदाराने प्रस्तूत अर्जात असे नमूद केले की, त्यांच्या मालकीचा वर नमूद मोबाईल हा पोलिस ठाणे हिंगोली शहर येथे अपराध क्रमांक ६७२/२०१९ कलम ३५४ (ड) भा.दं.वि. व सहकलम ६७ (अ) आय.टि. ॲक्ट अन्वये जप्त करून पोलिसांनी त्यांच्या ताब्यात ठेवलेला आहे. सदर मोबाईल त्यांच्या मालकीचा असून त्यांच्या दैनंदिन वापराचा आहे. वर नमूद मोबाईल पोलिस ठाणे येथे पडून राहिल्यामुळे त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. त्यामुळे सदरचा मोबाईल सुपूर्तनाम्यावर देण्याची त्यांनी विनंती केलेली आहे.

०३. सदर अर्जावर तपासीक अंमलदार व सरकारी वकिलांचे म्हणणे मागविण्यात आले. तपासीक अंमलदार यांनी त्यांचे म्हणणे निशाणी ०६ वर दाखल केले. त्यात त्यांनी असे नमूद केले आहे की, सदर मोबाईलचा वापर करून फिर्यादी / पिडित महिलेचे व्हॉट्सॲप वर वाईट उददेशाने मॅसेज पाठविलेले असल्याने फिर्यादी व आरोपीचे मोबाईल जप्त केलेले आहेत व ते मा. संचालक, न्यायवैदयक प्रयोगशाळा, कलीना, सांताक्रुज, मुंबई येथे दिनांक ०५/०१/२०२० रोजी सी.ए. तपासणी करीता पाठविण्यात आलेले आहेत. सदर गुन्हयाचा तपास चालू आहे. म्हणून त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

०४. तसेच सरकारी वकिलांनी त्यांचे म्हणणे सदर अर्जावर दाखल केले. त्यात त्यांनी असे नमूद केले की, फिर्याद मध्ये नमूद मोबाईलचा वापर करून अर्जदार/आरोपीने वाईट संदेश पाठविले आहेत. त्यामुळे अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली.

०५. आरोपीचे वकिलांनी त्यांच्या युक्तीवादाच्या पुष्ठयर्थ **सुंदरभाई देसाई – वि– गुजरात राज्य, (एस.सी.) ए.आय.आर. २००३, ६३८** या

न्यायनिर्णयाचा दाखला देवून कथन केले की, अशा प्रकरणांमध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने जप्त मौल्यवान मुददेमाल सुपूर्तनाम्यावर देण्याचे निर्देश दिलेले आहेत. याउलट सरकारी वकिलांनी गुन्हा हा भा.दं.वि. कलम ३५४ प्रमाणे असल्याने व तपासीक अंमलदाराचे म्हणण्याप्रमाणे जप्त मोबाईल प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविलेला असल्याने अर्ज नामंजूर करावा अशी विनंती केली. आरोपीचे वकिलाने दाखल केलेल्या न्यायनिवाडयातील परिस्थिती व सदर प्रकरणातील परिस्थिती भिन्न असल्याने सदर न्यायनिवाडा या प्रकरणा करीता लागू पडत नसल्याचे माझे मत आहे.

०६. अर्ज व म्हणणे वाचले. अर्जदाराने प्रथम खबर अहवालाची प्रत, मोबाईल खरेदीची पावती दाखल केली. प्रथम खबर अहवालाचे अवलोकन केले असता फिर्यादीने असे नमूद केले की, आरोपी /अर्जदाराने वर नमूद मोबाईलचा वापर करून व्हॉट्सअॅपद्वारे फिर्यादीचे मोबाईलवरील व्हॉट्सअॅपवर फिर्यादीला लज्जा वाटेल असे वाईट उददेशाने संदेश पाठविले आहेत. मोबाईल खरेदीच्या पावतीवरून जप्त करण्यात आलेला मोबाईल अर्जदाराचे मालकीचा असल्याचे दिसते. परंतू सदरचा गुन्हा हा गंभीर स्वरूपाचा आहे. सदर प्रकरणात साक्षीपुरावा नोंदविणे बाकी आहे. त्यामुळे जप्त मोबाईल हा साक्षीपुराव्याचा महत्वपूर्ण भाग ठरू शकतो. तपासीक अंमलदाराने देखील सदरचा मोबाईल तपासणीसाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळा, मुंबई येथे पाठविल्याचे नमूद केलेले आहे. जप्त मोबाईल हा सायबर सेल येथे तपासणीसाठी पाठविण्यात आलेला असून त्याचा अहवाल येणे बाकी आहे असे दिसते. अशा परिस्थितीत जप्त मोबाईल अर्जदारास परत करणे संयुक्तीक ठरणार नसल्याचे माझे मत आहे. म्हणून खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

## आदेश

अर्ज नामंजूर करण्यात येतो.

Vivek Vithalrao Nivghekar
Digitally signed by Vivek Vithalrao Nivghekar
Date: 2020.02.12 16:55:32 +0530

( व्हि. व्हि. निवघेकर )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्र.०१) हिंगोली.

दिनांक ११/०२/२०२०